# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष ३ ले. अंक १ ला. नवी मुंबई  दिनांक १ ते ३१ जूलै २०१३ पाने ८  किंमत २० रूपये

## चला माहितीचा अधिकार वापरू, गरीब मुलांना शिक्षणांचा हक्क देऊ !




## श्रीमंताच्या शाळेत पोहचवा गरीबांचे बालक
## आरटीई ला दाखवा आरटीआयची झलक !

माहिती अधिकार कार्यकर्त्यांची शासनाकडे मागणी

## माहिती अधिकार अर्ज प्रक्रिया ऑनलाईन करा.

## भागो भागो भूत आया !
## आरटीआयला राजकीय पक्ष घाबरले !




माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक **नागरिक अधिकार**


**सुभाष बसवेकर**
● संपादक ●
**गणेश काजळे-पाटील**
●कार्यकारी संपादक●

**संपादक मंडळ /प्रतिनिधी**


किरण मांजरेकर (मुंबई)
रजनीकांत शिंदे (मुंबई)
प्रमोद लक्ष्मण कदम(मुंबई)
देविदास चौथमल (औरंगाबाद)
भगवान वाहूळे (पूणे)
राजेश ठाकूर (नागपूर)
राजेश बने (रायगड)
प्रीतम यादव (सातारा)
डॉ.नृसिंह भस्मे (कोल्हापूर)
अजित कोठारी (जालना)
मोतीराम काळे (नांदेड)
स.अहमद स.अली अन्सारी(परभणी)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : **नागरिक अधिकार**
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com
: web site :
rtimahasangh.weebly.com



## संपादकीय...........



# भागो भागो भूत आया !
# राजकीय पक्ष आरटीआय ला घाबरले

राजकीय पक्षांना माहितीचा अधिकार कायदा लागू असल्याचा निर्णय केंद्रीय माहिती आयोगाच्या पूर्णपीठाने दिला आणि राजकीय पक्षामध्ये भूकंप झाला.भागो भागो भूत आया अशी हकाटी बहूतांश राजकीय पक्षांनी दिली.केवळ आम आदमी पार्टी चे अरविंद केजरीवाल यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. हा अपवाद वगळता कॉंग्रेस ,भारतीय जनता पक्ष,कम्युनिष्ठ पक्ष बसपा व सपा अशा बहुतांश पक्षांनी राजकीय पक्ष आरटीआयच्या कक्षेत नकोत अशा सूर लावला.आता केंद्र सरकार तर या निर्णयांच्या विरोधात अद्यादेश आणून हा निर्णय निष्प्रभ करण्यासाठी हालचाली करीत असल्याच्या बातम्या येत आहेत.राजकीय पक्षांना आरटीआय लागू झाला तर राजकीय पक्षांना कोणी किती व केव्हा देणग्या दिल्या याचा हिशोब जनतेला द्यावा लागेल व आपले पितळ उघडे पडेल याची बहूतांश राजकीय पक्षांना धास्ती वाटत आहे हे या विरोधातून ध्वनीत होत आहे.आता राजकीय पक्ष हे समाजाच्या मालकीचे राहिलेले नाहीत.ते एका व्यक्तीच्या किंवा एका कुटुंबाच्या खासगी मालकीचे झालेले आहेत.उद्या जर स्वर्गातून जर प्रत्यक्ष मं.गांधी कॉंग्रेस कार्यालयात येऊन निवडणूकीचे तिकीट मागू लागले तरी त्यांच्याकडे निवडून येण्याचे मेरीट म्हणजेच चिकार बँक बॅलन्स व काळा पैसा नसल्यामुळे त्यांना तिकीट मिळणार नाही.उद्या स्वर्गीय आदरणीय दीनदयाळजी भाजपाच्या कार्यालयात गेले तर दीन आणि दयाळू माणसांचे निवडणूका लढविणे हे काम नाही हे वास्तव पुढे करून त्यांना बाजूला बसवले जाईल.आजकाल निवडणूका या विकास कार्यक्रम किंवा धोरणावर जिंकायच्या हे कालबाह्य झाले असून लोकशाही पैसे मोजून विकत घ्यायची वस्तू झाली आहे.देशातील १०० कोटी मतदारांना विकत घ्यायचे असेल तर चार आण्याच्या सभासद पावत्या फाडून गोळा केलेला मूठभर फंड थोडाच पूरणार आहे?त्यासाठी सत्तेचा गोळा भांडवलदार बोक्यांच्या तोंडात देऊन कोट्यावधीचा फंड जमवून सत्ता सुंदरीवर आपला हक्क शाबूत ठेवायचा हे धोरण ठरले असेल तर मग ही अंदरकी बात आरटीआयच्या माध्यमातून बाहेर येवून कशी चालेल ?या हिशोबातूनच राजकीय पक्षांनी माहिती अधिकार कायदा स्विकारायला नकार दिला आहे.

या देशात निवडणूक आयोग हे एक भन्नाट विनोदी प्रकरण आहे.राजकीय पक्षांनी पैसा कसा खर्च केला हे निवडणूक आयोग तपासतो परंतु हा पैसा कसा गोळा केला याचे निवडणूक आयोगाला काही देणे -घेणे नाही.जर एखाद्या व्यक्तीने व वा संस्थेने २० हजारांच्या वर देणगी दिली असेल तरच तिचा हिशोब ठेवणे राजकीय पक्षांना कायद्याने बंधनकारक आहे.२० हजाराखालील पावतीच्या नोंदीची गरज नाही.या कायद्यातील पळवाटेमुळे करोडो रूपये कोठून आले हे राजकीय पक्षांना सहज लपवता येते.राजकीय पक्षांच्या हिशोबातील हा नियम बदलला पाहिजे.सामान्य माणसांने १०० रूपयाची कर चोरी केली तर जबर दंड व तुरूंगवासाची शिक्षा या देशात होते.परंतु राजकीय पक्ष मात्र कायद्याच्या पडदयाआड करोडो रूपयांच्या हेराफेरी करतात व वरून मोकळे राहतात.हे निग्रहाने बदलले पाहिजे.चर्चा संवाद व अंतर्विरोध हे टप्पे राजकीय पक्षांच्या निर्णय प्रक्रियेचा प्राण असतो.हा भागही पारदर्शक असावा हे अधिक विवेकांने झाले पाहिजे. पण त्यावर कायद्याचा बडगा असू नये मात्र आणि राजकीय पक्षांना आर्थिक हितंसंबंधापुरता तरी माहिती अधिकार कायदा लागू झालाच पाहिजे.

# गरीबांच्या मुलांपर्यंत शिक्षण अधिकार पोहचला का?




## श्रीमंताच्या शाळेत पोहचवा गरीबांचे बालक आरटीई ला दाखवा आरटीआयची झलक !



केंद्रशासनाने २००९ मध्ये शिक्षणाचा अधिकार कायदा लागू केल्यानंतर महाराष्ट्र शासनाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २०१२ मंजूर करून तो राज्यातील प्रत्येक प्राथमिक शाळेस सन २०१२-१३ पासून लागू केला आहे.

राज्यातील प्रत्येक प्राथमिक शाळा शाळेच्या पहिलीच्या वर्गापासून एकूण विद्यार्थी संख्येपैकी पंचवीस टक्क्यापर्यंतच्या जागी नजीकच्या परिसरातील वंचित गटांच्या आणि दुर्बल घटकांतील बालकांच्या प्रवेशासाठी राखून ठेवतील व अशा बालकांना त्यांचे (प्राथमिक) शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण पूरतील.हा कायदा सर्व अनुदानित,विनाअनुदानित तसेच इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी ही लागू आहे.

## चला माहितीचा अधिकार वापरू, गरीब मुलांना शिक्षणांचा हक्क देऊ !

देशभर शिक्षणांचा अधिकार कायदा लागू झाला आहे.आता प्राथमिक शाळा मग ती अनुदानित असो की नसो,इंग्रजी माध्यमांची असली तरी या शाळेत पहिलीच्या किंवा केजी च्या वर्गात एकूण प्रवेशपात्र विद्यार्थी संख्येच्या २५ टक्के दुर्बल व वंचित घटकांतील गरीबांच्या मुलांना पूर्णपणे मोफत प्रवेश मिळालाच पाहिजे.अशा विद्यार्थ्यांना त्याच्या घरापासून सर्वांत जवळच्या शाळेत शिक्षण घेता आलेच पाहिजे हा त्या बालकांचा घटनात्मक हक्क आहे.राज्यभरातील विशेषत: नावाजलेल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा गरीबांच्या मुलांना हा हक्क देण्यात टाळाटाळ करीत आहेत.या गरीब मुलांना शिक्षणाचा हक्क मिळतो की नाही याची माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी तपासणी करावी.किती मुलांना जवळच्या चांगल्या शाळेत प्रवेश मिळाले याची शिक्षणअधिकारी यांच्याकडून माहिती घ्यावी.जर गरीब मुलांना त्यांचा अधिकार मिळाला नसेल तर अशी बाब प्रसार माध्यमासमोर व प्रशासनापर्यंत पोहचवावी.बालकांना त्यांचा शिक्षण हक्क मिळवून द्यावा.

# चला माहितीचा अधिकार वापरू गरीब मुलांना शिक्षणांचा हक्क देऊ !

## बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणांचा हक्क अधिनियम २०१२ ठळक वैशिष्ठ्ये

■ केंद्र शासनाने २००९ मध्ये शिक्षणाचा अधिकार कायदा लागू केल्यानंतर महाराष्ट्र शासनाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २०१२ मंजूर करून तो राज्यातील प्रत्येक प्राथमिक शाळेस सन २०१२-१३ पासून लागू केला आहे. राज्यातील प्रत्येक शाळा शाळेच्या पहिलीच्या वर्गापासून एकूण विद्याथ्री संख्येपैकी पंचवीस टक्क्यापर्यंतच्या जागी नजीकच्या परिसरातील वंचित गटांच्या आणि दुर्बल घटकांतील बालकांच्या प्रवेशासाठी राखून ठेवतील व अशा बालकांना त्यांचे (प्राथमिक) शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण पूरतील.आणखी असे की अशाा शाळा जर शालापूर्व शिक्षण देत असतील तर त्या शाळापूर्व शिक्षणासाठीच्या प्रवेशासाठी या तरतूदी लागू होतील.

■ या कायद्यानुसार प्रवेश घेतलेल्या बालकांना सापत्नभावाची वागणूक दिली जाणार नाही.त्यांना इतर बालकांपासून वेगळे ठेवले जाणार नाही.पूर्ण फी भरून शिक्षण घेत असलेल्या बालकांच्या बरोबरच त्याच वर्गात मोफत प्रवेश मिळालेली बालके शिकतील.मोफत प्रवेश मिळालेल्या बालकांना गणवेश,ग्रंथालय सुविधा पाठ्येतर सुविधा व खेळ या बांबीसंबंधात कोणत्याही इतर बालकांपेक्षा वेगळी वागणूक दिली जाणार नाही.

■ वंचित बालक याचा अर्थ आहे अनुसूचित जाती व अनूसूचित जमाती मधील बालके असा आहे.या बालकांना प्रवेश घेण्यासाठी उपजिल्हाधिकारी किंवा समकक्ष महसूल अधिकारी यांनी प्रमाणति केलेला जातीचा दाखला आवश्यक आहे.

■ दुर्बल घटकांतील बालक यांचा अर्थ आहे ज्या बालकांच्या मात्यापित्याचे वार्षिक उत्पन्न एक लाख रूपयापेक्षा कमी आहे अशी बालके.(यात प्रामुख्याने विमुक्त जाती भटक्या जाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग व धार्मिक अल्पसंख्यांक या सह इतर बालक ) यासाठी तहसीलदार किंवा तालुका दंडाधिकारी यांचे किंवा समकक्ष अधिकारी यांनी दिलेले उत्पनांचा दाखला आवश्यक आहे.प्रवेश देताना वरील दोन्ही प्रवर्गातील मुलींना प्राधान्य मिळेल.

■ प्रवेशांसाठी कागदपत्रे ■

■ निवासाचा पूरावा आधार कार्ड,लाईट बील, पाणीपट्‌टी किंवा घरपट्टी या पैकी एक पूरावा पूरेसा आहे

■ मुलांचे जन्म प्रमाणपत्र किंवा जन्म प्रमाणपत्र नसल्यास पालाकांचे शपथपत्र,

■अनुसूचित जाती वा जमातीच्या बालकांसाठी जातीचा सरकारी दाखला ■ इतर अन्य बालकांसाठी तहसीलदार यांचे उत्पन्न प्रमाणपत्र

■ मोफत जागेवर प्रवेश दिल्यांनतर माहिती पत्रकांचे मूल्य, कोणतीही नोंदणी फी, शिकवणी फी वा इतर कोणताही आकार किंवा निधी पालक किंवा बालक यांच्याकडून घेतला जाणार नाही.तसेच प्रवेशासाठी पालक किंवा बालक यांच्या मुलाखती तोंडी वा लेखी चाचणी असे निकष लावता येणार नाहीत.

■ प्रवेशांची पद्धत ■

■ आरक्षणांच्या जागाभरण्यासाठी प्रत्येक प्राथमिक शाळा आपल्या एकूण जागापैकी २५ टक्के जागांची संख्या निश्चीत करील. प्रवेश देण्यासाठी शाळेच्या पासून एक किलोमिटर परिघ क्षेत्रातील सर्व पात्र पालकांकडून अर्ज मागविले जातील.अर्ज पुरेशे न आल्यास तीन किलोमिटर परिघ क्षेत्रातील पालकांकडून अर्ज मागविले जातील.अर्जासह संपूर्ण प्रक्रिया मोफत असेल.आलेल्या अर्जांची संख्या आरक्षित जागेपेक्षा अधिक असल्यास सोडत काढली जाईल.अशी सोडत पालक शिक्षक संघाचा प्रतिनिधी ,शाळेचा प्रतिनिधी व शिक्षणाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेली व्यक्ती अशा तिघांच्या उपस्थितीत काढली जाईल.सोडतीकरिता पात्र विद्यार्थ्यांची यादी प्रदर्शित केली जाईल.नंतर सोडत काढून प्रवेश पात्र विद्यार्थ्यांची अंतिम यादी प्रदर्शित केली जाईल.त्याच वेळी प्रतिक्षा यादीही काढली जाईल.प्रवेशांचा अंतिम दिनांक ठरविला जाईल.प्रवेशपात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेवून आणखी जागा रिक्त राहत असतील तर प्रतिक्षायादीतील मुलांना प्रवेश दिला जाईल.

जिंकणारा कधी सोडत नाही आणि सोडणारा कधी जिंकत नाही !

# माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी आपल्या परिसरातील शाळेत शिक्षणाचा अधिकार कायदा योग्य राबविला जातो की नाही याची तपासणी करण्यासाठी नमूना अर्ज

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

## (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती अधिकारी
द्वारा शिक्षणाधिकारी प्राथमिक
किंवा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती
तालुका ........ जिल्हा --------------

१) अर्जदाराचे पूर्ण नाव :-----------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :-----------------------------------------------

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :(विषय व कालावधी)

विषय : ------------------- प्राथमिक शाळेतील बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम/ कायद्याच्या अंमलबजावणी ची सन २०१३-१४ मधील माहिती मिळणेबाबत.

१) सन २०१३ -१४ या शैक्षणिक वर्षासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम कोणत्या वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविली गेली ?

२) या वर्गात प्रवेश स्तरावर एकूण किती जागा होत्या ती संख्या द्यावी.

३) मोफत प्रवेश देण्यासाठी किती जागा होत्या ती संख्या द्यावी.

४)किती मोफत जागेवर प्रवेश देण्यात आला.

५)प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी द्यावी.किती जागा रिक्त आहेत

६) शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्याकडे किंवा तालूका शिक्षणविस्तार अधिकारी यांच्याकडे कार्यक्षेत्रातील सर्व प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम अन्वये भरून दिलेला नियम ४ नमूना ड च्या सर्व शाळांनी भरून दिलेल्या छायांकित प्रती द्याव्यात.

४) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन./ स्पीड पोष्ट पाठवावी

५) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : -------------------- अर्जदाराची सही

दिनांक : / /२०१ मो.

# माहिती अधिकार कार्यकर्त्यांची शासनाकडे मागणी

# माहिती अधिकार अर्ज प्रक्रिया ऑनलाईन करा.

र

प्रशासनामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे हे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे .आता अनेक सरकारी कार्यालये व आस्थापना स्वत:च्या वेबसाईट बनवित आहेत.काही सरकारी कार्यालयांनी चांगल्या वेबसाईट बनवल्याही आहेत.सर्वच सरकारी कार्यालयांनी अशा वेबसाईट बनविणे शासनांने बंधनकारक करणे आवश्यक आहे.कारण तसे शासनाने ई धोरणच आहे.लवकर बहूतांश कार्यालयांचया बेबसाईट बनतील या वेबसाईट वर माहिती अधिकार कायदा २००५ नुसार प्रत्येक सरकारी आस्थापनांनी आपली सर्व माहिती कलम ४ प्रमाणे एकूण १७ मुद्यामध्ये वेबसाईटवर माहिती देणे बंधनकारक आहे.प्रत्येक कार्यालयांने आपापल्या वेबसाईटवर माहिती अधिकाराचे ऑनलाईन अज्र स्विकारण्याची सोय उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे.त्यामुळे जनता व प्रशासन यांचा मोठा वेळ वाचणार आहे.प्रत्येक खात्यातील प्रत्येक कार्यालयाने जरवेबसाईटवरून माहिती अधिकारांचे ऑनलाईन अर्ज तसेच अर्ज शुल्क तसेच माहितीचे शुल्क ऑनलाईन स्विकारून माहिती देणे हे आता तंत्रज्ञानामुळे फारच शक्य व सोपे झालेले आहे.तसेच मागीतलेली माहिती अपलोड करून ती सर्वांसाठी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे.मुंबई पुणे व नागपूर येथील अनेक कार्यकर्त्यांनी ही मागणी शासनाकडे केलेली आहे. प्रशासनाला जबाबदार व पारदर्शक ठेवणे ही शासनाची जबाबदारी आहे शासनांकडून अशा अनेक मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्त्यांनाप्रशासनाकडे,शासनाकडे व आपापल्या भागातील स्थानिक लोकप्रतिनिधीकडे ही मागणी लावून धरावी.माहिती अधिकार कायदा प्रभावीपणे राबविला जावा याबाबत शासन व प्रशासन अगोदरच उदासिन आहे परंतु माहिती अधिकार कार्यकर्त्यांची एकजूट असल्यास हे अशक्यही नाही.

**माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,महाराष्ट्र**

सभासदांना प्रत्येकी ५० किंमतीची सदर पुस्तके मिळतील

१ ) पेटून उठा ! व्यवस्था बदला !!

२) मागा म्हणजे नक्की मिळेल !

३) नागरिकांची सनद

४) माहितीचा अधिकार

५) माझे हक्क माझे कर्त्यव्य !

**माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,महाराष्ट्र**

आता इंटरनेटवर ही उपलब्ध !

rtimahasangh.weebly.com

नागरिक अधिकार मासिकांचे जूने अंक

माहिती अधिकार महासंघाच्या सभासदांची यादी

नव्या घटना व घडामोडीची आवश्यक ती माहिती

ऑनलाईन सभासद नोंदविण्यांची सोय

जीवनाचे दूर्दैव हे की माणूस लवकर म्हातारा होतो आणि उशिरा शहाणा होतो.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : -----------------------------------------------------------

पत्ता :-----------------------------------------------------------

-------------------------------- पीनकोड [ | | | | | ]

मोबाईल : [ | | | | | | | | | ] [ | | | | | | | | | ]

ई मेल :---------------------

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक ------------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा : ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे : ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /------------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी ओळखपत्र खर्च १७०पोष्टेज खर्च ८०रूपये आणि १५० रूपयांची तीन पुस्तके व स्थानिक शाखा शुल्क १०० रूपये असे एकत्रीत ५०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व नागरिक अधिकार विषयक पुस्तके मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावीत.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

### कार्यालयीन उपयोगासाठी

सभासद कोड नंबर [ ]

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक [ / / २०१३ ] मुदत समाप्तीचा दिनांक [ / / २०१४ ]
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- सभासद प्रक्रिया शुल्क मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली

आपण वेबसाईट **rtimahasangh.weebly.com** वरूनही ऑनलाईन फार्म भरू शकता

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार जागरूक नागरिक यांच्याकडून - शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा. ओळखपत्र खर्च / पोष्टेज व नागरिक अधिकार प्रकाशनांची तीन पुस्तके असे एकत्रीत मुल्य ५०० रूपये स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून खाते नंबर **32619447406** स्वराज बहुउद्देशिय संस्था,खारघर नवी मुंबई या नावाने भरावेत..बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर सभासद ओळखपत्र व पुस्तके पाठवली जातील.सभासदांना महासंघाच्या वेबसाईडवरून **web site : rtimahasangh.weebly.com** ऑनलाईन फार्म भरता येईल.या अंकात पान ७ वर दिलेला सभासद फॉर्म झेरॉक्स करून सविस्तर भरून फोटो चिकटवून तो सायबर कॅफेमधून स्कॅन करूनही **mediamansubhash@gmail.com** या ई मेलवरूनही पाठविल्यास अधिक सोईचे होईल.तरी जास्तीत जास्त माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी सभासद व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

पोष्ट परवाना. No.G/NMD/128/2012-14

प्रति,

पाठविणार
पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-९६, सेक्टर -१२ खारघर
नवी मुंबई ४१०२१०
महाराष्ट्र
मो ९२२३५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले. रजि नं. MAHMAR/2011/40781